“गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार”
आणि “नाला खोलीकरण व रुंदीकरण”
ह्या दोन्ही योजना राज्यात कायमस्वरुपी
राबविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमाकः गामुध-२०२४/प्र.क्र.१६५/जल-१**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

**वाचा:-**

१. शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. गामुध-२०१७/ प्र.क्र.१३४/जल-१, दिनांक ६ मे, २०१७.
२. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जशिअ-२०२२/प्र.क्र.३०२/ जल-७, दिनांक ०३ जानेवारी, २०२३.
३. शासन निर्णय, मृद व जलसंधारण विभाग क्र. गामुध-२०२३/प्र.क्र.०३/जल-१३, दिनांक १६ जानेवारी, २०२३.
४. शासन निर्णय, मृद व जलसंधारण विभाग क्र. गामुध-२०२३/प्र.क्र.२२/जल-१३, दिनांक २० एप्रील, २०२३.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य हे देशात जास्त धरणे व जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट झालेली आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुर्न:स्थापीत होण्याबरोबरच कृषि उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. या दुहेरी उद्देशाने शासनाने राज्यातील धरणांमधील गाळ काढणे व तो शेतामध्ये पसरविणे यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक ०६ मे, २०१७ अन्वये "गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार" योजना राबविण्यात आली होती. सदर योजनेस दि. १६.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ दिली होती. परंतु जलस्तोत्रात गाळ साठणे ही क्रिया कायमस्वरुपाची असल्याने “गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार” ही योजना पुढील ३ वर्षापर्यंत मर्यादित न राहता ती कायमस्वरुपी राज्यात राबविण्याठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने दि.२०.०४.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तथापि वित्त विभागाने सदर योजनेस मा. मंत्रीमंडळाची मान्यता घ्यावी, असे अभिप्राय दिलेले आहे. त्यानुसार सदर "गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार" योजना कायमस्वरुपी राबविण्यासाठी मा. मंत्रीमंडळाच्या दि. ०४.१०.२०२४ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातून नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी मागणी करण्यात येत आहे. नाल्यातील गाळ काढणे व त्याचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यामुळे नाल्याची वहन क्षमता वाढून पुरामुळे शेतीचे तसेच गावातील होणारे नुकसान थांवबिणे शक्य आहे. तसेच नाला खोलीकरणामुळे भुजल साठा वाढण्यासही मदत होते. त्यामुळे नाल्यातून गाळ काढणे व नाला खोलीकरण व रुंदीकरण करणे ही कामे करतांना कामात एकसुत्रीपणा राहण्यासाठी व सदर कामे तात्रिंकदृष्ट्या योग्य पध्दतीने करण्यासाठी यासंदर्भात धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या दि.०४.०१.२०२४ रोजीच्या बैठकीत “नाला खोलीकरण व रुंदीकरण” ही योजना कायमस्वरुपी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेच्या मापदंडानूसार राबविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

राज्यातील जलसाठ्यांमध्ये साठलेला गाळ काढून जलाशयाची पाणीसाठा क्षमता पुन:र्स्थापीत करणे व सदर गाळ शेतात पसरवीने व त्यामूळे जमीनीची सुपीकता वाढविणे या दुहेरी उद्देशाने मा. मंत्रीमंडळाच्या दि. ०४.१०.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनूसरुन **“गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार” व “नाला खोलीकरण व रुंदीकरण”** या दोन्ही योजनेस राज्यात कायमस्वरुपी राबविण्यासास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

तसेच **“गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार”** व **“नाला खोलीकरण व रुंदीकरण”** या दोन्ही योजनेच्या पुढील पाच वर्षासाठी रु.२६०४ कोटी एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेसंदर्भात संदर्भ क्र. ४ येथे नमूद दि. २०.४.२०२३ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. यानंतर सदर दोन्ही योजना राबविण्यासंदर्भात सर्व अंमलबजावणी या शासननिर्णयानुसार करण्यात यावी.

**सदर दोन्ही** योजनेंतर्गत गाळ काढण्यासाठी व नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी यंत्रसामुग्री व इंधन खर्च यासाठी रु.३१/- प्रति घन मीटर दर अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच **“गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार”** या योजनेंतर्गत गाळ वाहून नेणा-या पात्र शेतकरी लाभार्थ्यांना प्रति एकर रु.३५.७५/प्रति घनमीटर याप्रमाणे रु. १५,०००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. हे अनुदान फक्त अडीच एकर पर्यंत म्हणजेच रु. ३७,५००/- अधिकाधिक देय राहील.

## (अ) "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" योजना अंबलबजावणीची कार्यपद्धती:-

### १) "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

**अ) स्थानिक शेतकऱ्यांचा सहभाग :-** या योजनेमध्ये अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतामध्ये गाळ नेण्यासाठी खर्च देण्यात (अनुदान) येईल व बहुभुधारक शेतकरी हे स्वखर्चाने गाळ वाहून नेण्यास तयार असणे ही प्राथमिक धारणा आहे.

**ब) सार्वजनिक व खाजगी भागिदारी :-** गाळ उपसण्याकरिता आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्च तसेच शेतक-यांना दिले जाणारे अनुदान शासनाकडून उपलब्ध होणा-या निधीमधून म्हणजेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार २.० या योजनेच्या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. यानंतर सदर योजनेकरिता नवीन लेखाशिर्ष घेऊन, त्यातुन कायमस्वरुपी चालणा-या योजनेचा खर्च भागविण्यात यावा. मात्र "गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार" यांच्या फायद्याबाबत जाणीव जागृती व ॲपवर माहिती भरुन ती योग्य असल्याची खात्री करुन घेण्याचे कार्य ग्रामपंचायत/अशासकीय संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

**क) अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर :-** या योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे जीओटॅगिंग, योजनेची संगणक प्रणालीवर माहिती संकलित करणे इत्यादी स्वरुपाची प्रक्रिया अवनी ॲप अन्वये करण्यात येईल. अवनी ॲप अंतर्गत खालील बाबींचा समावेश आहे:-

- जलस्तोत्र निहाय साचलेल्या गाळाची माहिती.
- प्रत्येक साईटची काम करण्यापूर्वीची आणि नंतरची चित्रे आणि व्हिडिओ.
- शेतकरी व त्यांनी नेलेल्या गाळाची माहिती.
- जलसाठे व गाव निहाय शेतकरी निहाय भूधारणा, घेऊन गेलेल्या गाळाचे प्रमाण व भरलेल्या ट्रॉलीची (ट्रॅक्टर ट्रॉलीच्या तपशीलासह) संख्या याची माहिती
- उत्खनन यंत्रसामुग्रीच्या कामाच्या तासांची संख्या.
- एकूण काढलेल्या गाळाचे प्रमाण
- त्यातील ताळमेळ समजून घेण्यासाठी दैनंदिन डेटा एंट्री आणि M.B रेकॉर्डिंग ची तपासणी केली जाईल.
- सर्व कामे कुठे वेगाने सुरू आहेत आणि कोणते जिल्हे मागे आहेत याची जिल्हास्तरीय माहिती. केलेल्या कामाची आणि शेतक-यांना कामाचा फायदा होत असल्याची एकत्रित माहिती

**ड) संनियंत्रणः-** या योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे मूल्यमापन अवनी ग्रामिण ॲप मार्फत करण्यात येणार आहे.

**इ) मूल्यमापन** : "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" ही योजना राबविल्याचा एक किंवा दोन पावसाळा गेल्यावर जलसाठ्यात झालेली वाढ व शेतक-यांचा उत्पादकतेत, उत्पादनात, उत्पन्नात आणि निव्वळ नफ्यात झालेली वाढ, जीवनमान उंचावणे या विषयी त्रयस्थ यंत्रणेमार्फत स्वतंत्र मुल्यमापन करण्यात येईल. यासाठी प्रकल्प खर्चाच्या १% पर्यंत खर्च करण्यात येईल.

**फ)** या योजनेंतर्गत १० वर्षापेक्षा जुन्या जलसाठ्यातील गाळ काढण्यात यावा. त्यामध्ये ६०० हेक्टर पेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या मृद व जलसंधारण विभागाच्या जलसाठ्यांना प्राध्यान्य देण्यात यावे. त्यानंतर इतर विभागाच्या जलसाठ्यांचा यासाठी विचार करण्यात यावा. तसेच सदर कामे करण्यापुर्वी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी संपुर्ण जिल्ह्याचा वार्षीक आराखडा तयार करून शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा. शासन मान्यतेनंतर जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करावी.

**ग)** सदर योजनेंतर्गत गाळ उपसा करण्यास परवानगी राहील तसेच पाणीसाठा वाढवण्याच्या हेतूने वाळू उत्खनन करावे लागत असल्यास महसुल विभागाचा प्रचलित नियमाप्रमाणे परवानगी घेण्यात यावी.

**ह)** जिल्हा स्तरावर या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग हे राहतील.

**२) निवड प्रक्रिया (यादी तयार करणे) :-**

१. गाळ घेऊन जाण्यास तयार असलेले सीमांत / अत्यअल्पभूधारक (१ हेक्टर पर्यंत) व लहान (१ ते २ हेक्टर) शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात येईल.

२. शिवाय विधवा, अपंग व आत्महत्याग्रस्त शेतकरी अनुदानास (सबसीडी) पात्र राहतील. सदर लाभार्थी जास्त जमीन धारण करत असले तरी अनुदानास पात्र राहतील.

**३) सदर दोन्ही कामासाठी अशासकीय संस्थाची निवडीचे निकष:-**

सदर कामे करण्यासाठी अशासकीय संस्थाची निवड करतांना सदर संस्थांनी खालील निकष पुर्ण करणे आवश्यक आहे:-

**अ.** सदर अशासकीय संस्था धर्मदाय आयुक्त, कंपनी कायदा, २०१३ कलम ८ खाली, सहकारी सोसायटी कायदा, १८६० , सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० यापैकी एका कायदा अंतर्गत अशासकीय संस्था (NGO) म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

**ब.** सदर संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट झाले असणे बंधनकारक राहील.

**क.** सदर काम करण्यासाठी अशासकीय संस्था उपलब्ध नसल्यास ग्रामपंचायत मार्फत सदर काम करण्यात यावे.

**ड.** गाळ काढण्यासाठी घेतलेल्या कामांचा संख्येचा प्रमाणात जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत व जलसाठा पातळीवर स्मार्टफोनवर डेटा प्रविष्ट करण्यास सक्षम असणारे पूरेसे कर्मचारी वर्ग नेमणूक करण्यास अशासकीय संस्था सक्षम असावी.

**इ.** अशासकीय संस्थांकडे संनियंत्रण आणि मूल्यांकनावर काम करण्याचा अनुभव असावा.

**फ.** अशासकीय संस्थेने वरील सर्व निकषांबाबतची कागदपत्रे (प्रमाणपत्रे) समितीस सादर करावे. समितीने सादर केलेल्या कागदपत्रांचा (प्रमाणपत्रांचा) आधारे साधकबाधक चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा.

**ग.** वरील सर्व निकषांबाबत प्रमाणपत्रे सदर अशासकीय संस्थांनी सादर करणे आवश्यक आहे.

**ह.** अशा अशासकीय संस्थांची निवड जिल्हास्तरीय समिती करेल. सदर संस्थांना कामांचे वाटप

व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस राहील.

**४) शेतक-यांना अनुदानाची मर्यादाः-**

"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" या योजनेंतर्गत पसरविण्यात आलेल्या गाळासाठी रु.३५.७५/ प्रति घनमीटर प्रमाणे एकरी रु. १५,०००/- च्या मर्यादेत म्हणजेच एकरामध्ये ४०० घनमीटर गाळाच्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. हे अनुदान फक्त अडीच एकर पर्यंत म्हणजेच रु.३७,५००/- अधिकाधिक देय राहील. विधवा, अपंग आणि आत्महत्याग्रस्त शेतक-यांना सुध्दा ही मर्यादा लागू राहील. **सदरचे अनुदान फक्त "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" या योजनेसाठी लागू आहे.**

**५) अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शन व कार्यपध्दती :-**

१. गावात "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" अंतर्गत काम सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीचे ठराव घेऊन प्रत्येक जलसाठयाचा कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून अशासकीय संस्थांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेमार्फत जिल्हा स्तरीय समितीस प्रस्ताव सादर करावा. त्यात जलसाठयामध्ये अंदाजे उपलब्ध गाळाचा प्रमाणाचा उल्लेख असणे बंधनकारक आहे.

२. जिल्हास्तरीय समितीने सदर प्रस्तावावर साधक-बाधक विचार करुन शासनाने निश्चित केलेल्या पात्रतेनुसार संबंधित संस्थेस कार्यकारी यंत्रणा व नमूद केलेल्या गाळाचे प्रमाण उपसण्यास प्रशासकीय मान्यता द्यावी.

३. जिल्हास्तरीय समितीस बैठकीअभावी मान्यता देण्यास कालावधी लागण्याची शक्यता असल्यास, अध्यक्ष व सचिवांच्या मान्यतेने संस्थेस कार्यकारी यंत्रणा म्हणून व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तद्नंतर समितीच्या अवलोकनार्थ ठेवावे.

४. एका जलसाठयाचे गाळ काढण्यासाठी एकापेक्षा अधिक अशासकीय सस्थांचे अर्ज आल्यास सबंधित संस्थाची क्षमता तपासून घेऊन जिल्हा समिती एका जलसाठ्यासाठी एक अशासकीय संस्थेची निवड करेल. सदर अशासकीय संस्थाचे कार्य खालीप्रमाणे राहील.

अ) सदर अशासकीय संस्था जिल्हयातील ज्या जलसाठ्यातून गाळ काढणार आहे त्या प्रत्येक जलसाठयाची माहिती, गाळ वाहून नेणा-या पात्र व अपात्र शेतक-यांची यादी, त्यासाठी ७/१२ चा उतारा आणि सदर शेतकरी विधवा, अपंग, आत्महत्याग्रस्त, अत्यल्प आणि अल्पभूधारक सदरात मोडतात याबाबतीत पंचनामा तसेच गाळाचे परिणाम. इ. माहिती अवनी ग्रामीण ॲपवर नोंदणी करेल. अवनी ग्रामीण ॲपवर भरण्यात येणारी माहिती बरोबर असल्याची खात्री करून नोडल अधिकरी (जिल्हा जलसंधारण अधिकारी) यांनी अवनी ग्रामीण ॲपवर मान्यता प्रदान करावी.

ब) अशासकीय संस्थानी या योजनेंतर्गत सादर केलेल्या पंचनाम्यात ग्रामसेवक, जिल्हा परिषद शिक्षक, तलाठी यापैकी कोणत्याही एक कर्मचारी यांची सहमती असणे आवश्यक राहील.

क) अशासकीय संस्थामध्ये नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांना अवनी ग्रामीण ॲप संदर्भातील प्रशिक्षण A.T.E. Chandra Foundation यांचेमार्फत दिले जाई

५. अशा प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अशा क्षेत्रातील संबंधित शासकीय यंत्रणेमार्फत धरणातील/जलसाठयातील, गाळ उपसा परिमाण इ. बाबी प्रमाणित करुन त्यानुसार उपविभागीय जलसंधारण अधिकारी / उपविभागीय अभियंता द्वारे अंदाजपत्रक तयार करण्यात येईल व तसे संबंधित संस्थेस कळविण्यात येईल.

६. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे स्तरावर उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तपासणी करुन प्रस्तावाना तांत्रिक मान्यता देण्यात येईल व तसे सबंधित अशासकीय संस्थेस कळविण्यात येईल.

७. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार प्रत्यक्ष गाळ उपसण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८. गाळ काढण्याचे काम सुरु करण्यापूर्वी जलसाठ्याचे फोटो तथा व्हिडिओ काढण्यात येऊन त्याचे जिओटॅगिंग करण्यात येईल.

९. साधारणपणे "प्रथम येणा-याला प्राधान्य" या तत्वाप्रमाणे गाळाची वाटणी शेतकऱ्यांमध्ये करण्यात येईल. तरी सुद्धा विधवा, अपंग, आत्महत्याग्रस्त, अत्यल्प आणि अल्पभूधारक असा प्राधान्यक्रम ठरविण्यात यावा. याआधीचा अनुभव आधारे दिसून आले आहे की, या मापदंडात बसणारे साधारण ४० टक्के लोक असतात. त्यामुळे या प्राधान्यक्रमातील प्रत्येकाला गाळ मिळेल. तरी सुद्धा काही वाद उद्भवल्यास तो विकोपाला जाणार नाही त्याबाबतची जबाबदारी अशासकीय संस्थांनी घ्यावी.

१०. गाळ मुक्त धरण व गाळ युक्त शिवार योजनेचे काम चालु झाले पासून काम संपेपर्यंत अशासकीय संस्था अवनी ग्रामीण ॲप खालील प्रमाणे दररोज माहिती भरावी व त्यास नोडल अधिकरी (जिल्हा जलसंधारण अधिकारी) यांनी अवनी ग्रामीण ॲपवर मान्यता द्यावी.

अ. अशासकीय संस्था यांनी जलसाठयातील काढलेल्या गाळाचे प्रमाण व प्रत्येक शेतक-याने घेऊन गेलेल्या गाळाचे प्रमाण तपशील अवनी ग्रामीण ॲपवर भरावा .

ब. अशासकीय संस्था यांनी या योजनेंतर्गत गाळ काढणेसाठी व तो वाहून नेण्यासाठी वापरली जाणा-या मशिनरीची माहितीचा तपशील अवनी ग्रामीण ॲपवर भरावा.

११. वाहून नेण्यात येणारा गाळ संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात वापरणे बंधनकारक असून अशा गाळाची (गौण खनिजाची) विक्री किंवा त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही. कोणतीही संस्था असे करत असल्याचे आढळून आल्यास त्याविरोधात उचित कारवाई करण्यात येईल.

१२. गाळ काढण्याचे कार्य पूर्ण झाल्यानंतर अंतिम अहवालावर चर्चा करण्यासाठी ग्रामसभा घेण्यात यावी व त्यास ग्रामसभेची मान्यता घेण्यात यावी.

१३. उपविभागीय जलसंधारण अधिकारी / उपअभियंता यांनी "पास फार पेमेंट" (शेतक-यांचे नाव, गाळाचे प्रमाण, अनुदान नमूद करुन करुन) जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्याकडे देयक अदा करण्यासाठी सादर करावे. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्ह्यांतील कामाची एकत्रीत निधी मागणी जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाकडे करावी. शासनाकडून प्राप्त निधीनुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी संबंधित अशासकिय संस्था/ग्रामपंचायत यांना देयक अदा करावे. सदर देयक अदा करताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा:-

अ) इंधन व यंत्रसामुग्रीचे देयक अशासकीय संस्थेस अदा करावे.

ब) शेतक-यांना देण्यात येणारे सवलतीचे अनुदान DBT (Direct Bank Transfer) मार्फत देण्यात यावे. शासनाद्वारे निश्चित करण्यात येणा-या बँकेमार्फत DBT ची प्रक्रीया करावी.

क) DBT (Direct Bank Transfer) ची कार्यपध्दती अमलात येईपर्यंत शेतक-यांना देण्यात येणारे सवलतीचे अनुदान जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी ग्रामपंचायतीकडे पाठवावे. ग्रामपंचायतीने सदर निधी प्राप्त झाल्याचे एका आठवडयाचे आत संबंधित शेतक-यांना अनुदान अदा करावे.

**६) सदर दोन्ही योजनेसंदर्भात सनियंत्रण समित्याः-**

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करीता खालील प्रमाणे राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तर समित्या गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**अ) राज्यस्तर:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| २ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव जलसंपदा विभाग | - | सदस्य |
| ३ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव कृषि विभाग | - | सदस्य |
| ४ | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग | - | सदस्य |
| ५ | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, मृद व जलसंधारण विभाग | - | सदस्य सचिव |
| ६ | अशासकीय संस्थाचे प्रतिनिधी | - | विशेष आमंत्रित |

**कार्यकक्षा:- सदर योजनेतर्गत धोरणात्मक अडचणी उद्भल्यास, त्याप्रमाणे निर्णय घेणे व अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, मृद व जलसंधारण यांनी वेळोवेळी या योजनेचा आढावा घ्यावा.**

**ब) जिल्हास्तर :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| ३ | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग | - | सदस्य सचिव |
| ४ | निरिक्षक, भुमिअभिलेख | - | सदस्य |
| ५ | जिल्हा माहिती अधिकारी | - | सदस्य |
| ६ | अशासकीय संस्थाचे प्रतिनिधी | - | विशेष आमंत्रित |

कार्यकक्षा :

**१. सदर कामासाठी अशासकीय संस्था/ग्रामपंचायतची निवड करणे.**
**२. कामांना प्रशासकीय मान्यता देणे.**
**३. गाळ उत्खनाची कामे सुरु केल्यानंतरचे फोटो व उत्खनन पूर्ण झाल्यानंतरचे फोटो संबंधित यंत्रणेने ऑनलाईन प्रणालीवर अपलोड केल्याबाबतची खात्री करणे.**
**४. सदर कामे जलदगतीने पुर्ण होतील यासाठी कामांचा वेळोवेळी आढावा घेणे.**

तालुकास्तर :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उप विभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग | - | अध्यक्ष |
| २ | तालुकास्तर कृषि अधिकारी | - | सदस्य |
| ३ | निरिक्षक, भुमिअभिलेख | - | सदस्य |
| ४ | जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण | - | सदस्य सचिव |
| ५ | अशासकीय संस्था व खाजगी क्षेत्र प्रतिनिधी | - | विशेष आमंत्रित |

कार्यकक्षा:-

**१. गाळ उत्खनन करण्याच्या कामाचे प्रस्तावांची तांत्रिकदृष्ट्या छाननी करणे.**
**२. गाळ वाहून नेणारे लाभार्थी यांची यादी तयार करणे.**
**३. त्यानुसार सदर कामाचा प्रस्ताव जिल्हास्तर समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे.**
**४. वेळोवेळी चालू कामाचा आढावा घेणे.**
**५. काम पूर्ण झालेल्या कामांचा निधी मागणी प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे.**

**७) निधीचे स्तोत्र:-**

सदर योजनेंतर्गत गाळ उपसण्याकरिता आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्च (दोन्ही मिळून रु.३१ प्रति घ.मी. यानुसार) व गाळ वाहून नेण्यासाठी अत्यल्प व अल्प भूधारक

शेतक-यांना एकरी रु १५,०००/- च्या मर्यादेत (प्रति घनमीटर रु ३५.७५ प्रमाणे) अनुदान शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून म्हणजेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार २.० या योजनेच्या लेखाशिर्ष ४४०२ २७८१ मधून करण्यात येणार आहे. दरम्यानच्या काळात मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनूसार गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या योजनेकरिता स्वतंत्ररिता लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर लेखाशिर्ष उपलब्ध झाल्यानंतर त्या लेखाशिर्षतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

गाळ काढण्यासाठीचा दर हा सद्यस्थितीत असलेल्या Common Schedule Rate (CSR), WCD २०२२-२०२३ नुसार निश्चित केलेला आहे. CSR मध्ये भविष्यात होणा-या वाढ़ीनुसार दरात बदल करण्याचे अधिकार शासनास राहील.

**८) सदर योजनेतर्गत निधी वितरण अवनी ॲपच्या माहिती वर आधारित खालीलप्रमाणे करण्यात येईल :-**

१. अशासकीय संस्था/ ग्रामपंचायत यांना जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेमार्फत निधी अदा करण्यात येईल.

२. अल्प व अत्यल्प भूधारकांना DBT (Direct Bank Transfer) ची सुविधा प्राप्त होईपर्यंत ग्रामपंयातीकडून अनुदान वितरीत करण्यात येईल

३. गाळाचे प्रमाण मोठे असल्यास, अशा वेळी गाळ काढण्याच्या भागाचे (Part Payment) अदा करण्याची आवश्यकता भासल्यास अवनी ॲपच्या माहिति अन्वये दोन किंवा अधिक भागात देयक अदा करण्यात येईल. मात्र अंतिम देयकाचे वितरण हे ग्रामसभेच्या मान्यतेअंती अदा करण्यात येईल.

## (आ)" नाला खोलीकरण व रुंदीकरण" योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती:-

### १) " नाला खोलीकरण व रुंदीकरण" या योजनेची उद्दीष्टे:-

अ) नाला खोलीकरण करणे याचा मख्य हेतु भूपृष्ठी पाणी साठवण (surface Water Storage) नसून भूजल पुनर्भरण हा आहे. पाणीसाठा भूपृष्ठीय असल्यास बाष्पीभवनामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते. त्याऐवजी भूपृष्ठाखाली पुनर्भरित पाण्याचे बाष्पीभवन जवळ-जवळ निरंक असते.
ब) नालापात्रात गाळ साठल्याने नाल्याचा छेद (Cross Section Areas) कमी होतो. नालापात्र उथळ झाल्याने पाणी वाहून नेण्याची क्षमता कमी होते व पूरस्थितीत प्रवाहाचे पाणी मूळ नाला पात्राबाहेरील भागात पसरून लगतच्या शेतातील मातीचा सुपीक थर वाहून जातो. नाला खोलीकरणाने ही समस्या काही अंशी कमी होईल.
क) खोलीकरणामुळे उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यामुळे पुनर्भरणासाठी अतिरिक्त पाण्या साठी काही अवधी (Retention Period) मिळाल्याने परिसरातील भूजल पातळीत वाढ होईल. पर्यायाने त्यापरिसरात मान्सूनोत्तर काळात अधिक कालावधीपर्यंत भूजल उपलब्ध होऊ शकेल.

**२) नाला खोलीकरण व रुंदीकरण करणे ही कामे करण्याबाबतचे निकष:-**

१. नाला खोलीकरण हे फक्त २ order व ३d order या वर्गीकरणातील जलप्रवाहांवरच घेण्यात यावे.

२. सदर नाल्याला मागील पाच वर्षात पुर आला त्यामुळे लगतच्या शेताचे/गावाचे नुकसान झाले असल्यास सदर नाल्याच्या खोलीकरणाचे काम घ्यावे. त्यासाठी नुकसानीचे पंचनामे पुरावे म्हणुन सादर करावे.

३. नाल्याची संपुर्ण लांबीचा भाग खोलीकरणासाठी न घेता ज्या भागात खोलीकरणाची आवश्यकता आहे अशाच भागाचे खोलीकरण व रुंदीकरण १०० मीटर प्रमाणे टप्पे करून करण्यात यावे.

४. उपलब्ध अपधावेच्या (Surface Runoff Calculation) सीमीत राहूनच नाला खोलीकरणाची लांबी निश्चित करावी.

५. ज्या ठिकाणी नालापात्रात वाळू साठा आहे अशा नाल्याचे खोलीकरण करु नये.

६. ज्या ठिकाणी नालापात्रांची नैसर्गिक खोली ३ मीटरपेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणेच्या परवानगी शिवाय नाला खोलीकरणाचे काम करू नये.

७. नाला खोलीकरणासाठी कठीण पाषाणात खोदकाम करु नये म्हणजेच मुरुमाच्या थरापर्यंत खोदकाम नसावे.

८. नाला खोलीकरणाची कमाल मर्यादा नाला तळापासून (Nala Bed) ३ मीटर पर्यंत भुस्तराचा अभ्यास करून घ्यावी.

९. अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये ही कामे अग्रक्रमाने राबविण्यात यावीत.

१०. अस्तित्वातील बंधाऱ्यांच्या उर्ध्ववाह क्षेत्रा (Stream Side) मध्ये नाला खोलीकरण केल्यास जास्त लाभदायक होईल.

११. रुपांतरित पाषाण प्रदेशात (Alluvial Area) नाला खोलीकरणाचे काम हाती घेता येणार नाही.

१२. गाळाच्या भूभागातील बंझाडा (Laterite) भूस्तराचा भाग हा नाला खोलीकरण या उपाययोजनांसाठी अत्यंत योग्य आहे.

१३. नाल्यामध्ये अस्तित्वात असलेल्या सिनाबां/कोप बंधारा आदी बांधकामांच्या पायापासून ५० मीटर अधो व उर्ध्व बाजूस कोणत्याही प्रकारचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येवू नये.

१४. पात्राच्या प्रत्येकी १०० मीटरच्या टप्प्यांमध्ये दर १५ मीटरच्या अंतरावर (१५ meters C/C) काम सुरु होण्यापुर्वी व काम झाल्यानंतरचे रुंदी, लांबी व तलांकाचे मोजमाप करण्यात यावे.

१५. आवश्यकतेनुसार प्रवाहाच्या उलट्या दिशेने भुमीगत बंधा-यांचा साखळी पध्दतीने खोलीकरणाच्या कामात समावेश करण्यात यावा.

**३) अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर :-** या योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे जीओटॅगिंग, योजनेची संगणक प्रणालीवर माहिती संकलित करणे इत्यादी स्वरुपाची प्रक्रिया अवनी ॲप अन्वये करण्यात येईल. अवनी ॲप अंतर्गत खालील बाबींचा समावेश आहे:-

- नाल्यानिहाय साचलेल्या गाळाची माहिती.
- प्रत्येक साईटची काम करण्यापूर्वीची आणि नंतरची चित्रे आणि व्हिडिओ.
- उत्खनन यंत्रसामुग्रीच्या कामाच्या तासांची संख्या.
- एकूण काढलेल्या गाळाचे प्रमाण
- त्यातील ताळमेळ समजून घेण्यासाठी दैनंदिन डेटा एंट्री आणि M.B रेकॉर्डिंग ची तपासणी केली जाईल.
- सर्व कामे कुठे वेगाने सुरू आहेत आणि कोणते जिल्हे मागे आहेत याची जिल्हास्तरीय माहिती. केलेल्या कामाची आणि शेतक-यांना कामाचा फायदा होत असल्याची एकत्रित माहिती

**अ) संनियंत्रणः-** या योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे मूल्यमापन अवनी ग्रामिण ॲप मार्फत करण्यात येणार आहे

**ब)मूल्यमापन : नाला खोलीकरण व रुंदीकरण** ही योजना राबविल्याचा एक किंवा दोन पावसाळा गेल्यावर भूजलात झालेली वाढ व पुरावर नियंत्रण या विषयी त्रयस्थ यंत्रणेमार्फत स्वतंत्र मुल्यमापन करण्यात येईल. यासाठी प्रकल्प खर्चाच्या १% पर्यंत खर्च करण्यात येईल.

**क)**जिल्हा स्तरावर या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग हे राहतील.

**४) नाला खोलीकरण व रुंदीकरण यजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शन व कार्यपध्दती :-**

१. गावात "नाला खोलीकरण व रुंदीकरण" अंतर्गत काम सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीचे ठराव घेऊन अशासकीय संस्थांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेमार्फत जिल्हा स्तरीय समितीस प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी कामामध्ये अंदाजे उपलब्ध गाळाचा प्रमाणाचा उल्लेख असणे बंधनकारक आहे. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी सदर कामाचा वार्षिक आराखडा तयार करून शासनास सादर करावा. शासनाच्या मान्यतेनंतर त्यास जिल्हा स्तरीय समीतीमार्फत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल.

२. जिल्हास्तरीय समितीने सदर प्रस्तावावर साधक-बाधक विचार करुन शासनाने निश्चित केलेल्या पात्रतेनुसार संबंधित संस्थेस कार्यकारी यंत्रणा व नमूद नाल्यातील गाळाचे प्रमाण उपसण्यास प्रशासकीय मान्यता द्यावी.

३. जिल्हास्तरीय समितीस बैठकीअभावी मान्यता देण्यास कालावधी लागण्याची शक्यता असल्यास, अध्यक्ष व सचिवांच्या मान्यतेने संस्थेस कार्यकारी यंत्रणा म्हणून व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तद्नंतर समितीच्या अवलोकनार्थ ठेवावे.

४. एका नाल्याचे खोलीकरण करण्यासाठी एकापेक्षा अधिक अशासकीय सस्थांचे अर्ज आल्यास सबंधित संस्थाची क्षमता तपासून घेऊन जिल्हा समिति एका जलसाठ्यासाठी एक अशासकीय संस्थेची निवड करेल. सदर अशासकीय संस्थाचे कार्य खालीप्रमाणे राहील.

i. सदर संस्था जिल्हयातील ज्या नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करणार आहे त्या प्रत्येक नाल्याची माहिती अवनी ग्रामीण ॲपवर नोंदणी करेल. अवनी ग्रामीण ॲपवर भरण्यात येणारी माहिती बरोबर असल्याचे सदर संस्थेतील कार्यरत इतर व्यक्तीकडून प्रमाणित करुन घेईल.

ii. अशासकीय संस्थामध्ये नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांना अवनी ग्रामीण ॲप संदर्भातील प्रशिक्षण A.T.E. Chandra Foundation यांचेमार्फत दिले जाई

५. संस्थाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अशा क्षेत्रातील संबंधित शासकीय यंत्रणेमार्फत नाल्यातील गाळ उपसा परिमाण व इतर आवश्यक बाबी प्रमाणित करुन त्यानुसार उपअभियंत्याद्वारे अंदाजपत्रक तयार करण्यात येईल व तसे संबंधित संस्थेस कळविण्यात येईल.

६. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे स्तरावर उपविभागिय जलसंधारण अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तपासणी करुन प्रस्तावाना तांत्रिक मान्यता देण्यात येईल व तसे सबंधित अशासकीय संस्थेस कळविण्यात येईल.

७. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार प्रत्यक्ष नाला खोलीकरणाचे काम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८. नाला खोलीकरणाचे काम सुरु करण्यापूर्वी जलसाठ्याचे फोटो तथा व्हिडिओ काढण्यात येऊन त्याचे जिओटॅगिंग करण्यात येईल.

९. नाल्यातून काढलेला गाळ त्याच नाल्याच्या तिरावर भविष्यात येणा-या पुरामुळे वाहून जाणार नाही अश्या पध्द्तीने टाकावा. सदर गाळाची (गौण खनिजाची) विक्री किंवा त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही. सदर कोणतीही संस्था असे करत असल्याचे आढळून आल्यास त्याविरोधात उचित कारवाई करण्यात येईल. नाला खोलीकरण / रुंदीकरणाच्या कामातून निघणा-या गाळाच्या वाहतुकीसाठी कोणताही खर्च दिला जाणार नाही.

१०.गाळ काढण्याचे कार्य पूर्ण झाल्यानंतर अंतिम अहवालावर चर्चा करण्यासाठी ग्रामसभा घेण्यात यावी व त्यास ग्रामसभेची मान्यता घेण्यात यावी.

११.उपअभियंता यांनी "पास फार पेमेंट" (शेतक-यांचे नाव, गाळाचे प्रमाण, अनुदान नमूद करुन करुन) जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्याकडे देयक अदा करण्यासाठी सादर करावा. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्ह्यांतील कामाची एकत्रीत निधी मागणी जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाकडे करावी. शासनाकडून प्राप्त निधीनुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी संबंधित संस्था/ग्रामपंचायत यांना देयक अदा करावे. सदर देयक अदा करताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा:-

**५) निधीचे स्तोत्र:-**

अ) नाला खोलीकरण व रुंदीकरण यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व इंधनावरील खर्च (दोन्ही मिळून रु.३१ प्रति घ.मी. यानुसार) अनुदान शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या

निधीमधून म्हणजेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार २.० या योजनेच्या लेखाशिर्ष ४४०२ २७८१ मधून करण्यात येणार आहे.

ब)दरम्यानच्या काळात मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनूसार गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार व नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन्ही योजनेकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर लेखाशिर्ष उपलब्ध झाल्यानंतर त्या लेखाशिर्षतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेनुसार नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी सद्यस्थितीत निश्चित केल्यानुसार रु.३१/- प्रती घनमीटर याप्रमाणे दर लागू राहतील. सदर दर हा सद्यस्थितीत असलेल्या Common Schedule Rate (CSR), WCD २०२२-२०२३ नुसार निश्चित केलेला आहे. CSR मध्ये भविष्यात होणा-या वाढ़ीनुसार दरात बदल करण्याचे अधिकार शासनास राहील.

**६) सदर योजनेतर्गत निधी वितरण अवनी ॲपच्या माहिती वर आधारित खालीलप्रमाणे करण्यात येईल :-**

अ) अशासकीय संस्थाना जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचेमार्फत निधी अदा करण्यात येईल.

ब) गाळाचे प्रमाण मोठे असल्यास, अशा वेळी गाळ काढण्याच्या भागाचे (Part Payment) अदा करण्याची आवश्यकता भासल्यास अवनी ॲपच्या माहिती अन्वये दोन किंवा अधिक भागात देयक अदा करण्यात येईल. मात्र अंतिम देयकाचे वितरण हे ग्रामसभेच्या मान्यतेअंती अदा करण्यात येईल.

हा शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि.०४.१०.२०२४ रोजीच्या झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व नियोजन विभाग, अनौ. क्र.२९६/२४/१४३४ दि. २०.०९.२०२४, वित्त विभाग, यांचे अनौपचारिक संदर्भ क्रः अनौ. सं. क्र. ६४६/२०२४/व्यय-१५, दि. ३०.०९.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१०१५१२३१४३१०२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAKASH NILKANTHRAO PATIL

Digitally signed by PRAKASH NILKANTHRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, 2.5.4.20=a7dc90f966c671a9acd0a599ee5fc497272e775d33643b14725c6a77432c673f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EC28A96B2A52575AE4CCCA512D1723F249D503AE71CF458BA4863AACFFBF62, cn=PRAKASH NILKANTHRAO PATIL
Date: 2024.10.15 12:32:28 +05'30'

**(प्र. नि. पाटील)**
**अधीक्षक अभियंता तथा उपसचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य.
५. मा- मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
६. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (मृद व जलसंधारण), मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव (ज.सं.प्र. व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव (ज. सं. व्य. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव कृषि, मंत्रालय, मुंबई
१३.सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक
१४.सर्व विभागीय आयुक्त
१५.आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६.सर्व अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र
१७.सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१९.महालेखापाल एक व दोन महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२०.सर्व जिल्हाधिकारी.
२१.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२२.सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
२३.सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२४.सर्व उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय,
२५.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२६.सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
२७.सर्व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन जिल्हा परिषद विभाग
२८. सर्व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी
२९.सर्व मंत्रालयीन विभाग.
३०.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
३१.नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३२.जल-८, निवड नस्ती.